संपर्कक्रमांक(020) 2447 6938
E-mail: vgpgdept@maa.ac.in

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

जाक्र/राशैसंवप्रप/व्हीजीपीजी/सुनावणी/२०२२-२०२३/१९४९ दि-२१.०४.२०२२

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद (सर्व)
४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)
५) शिक्षण निरिक्षक (उत्तर,दक्षिण,पश्चिम) मुंबई.

विषयः- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमासंदर्भात देण्यात येणाऱ्या विविध सूचनांबाबत.

संदर्भः- १) मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मानवधिकार आयोग,मुंबई यांचेकडील प्रकरण क्रमांक KKT/Case No - ३५८/१३/२४/२०२२ बाबत प्राप्त आदेश.

उपरोक्त संदर्भ व विषयाच्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने राज्यातील विद्यार्थ्यासाठी महाकरिअर पोर्टल, समुपदेशन सेवा, करिअर वेबिनार,परीक्षा पर्व ४.०, नवोपक्रम स्पर्धा, प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण, शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण प्रशिक्षण, शालेय सुरक्षितता व बालकांचे हक्क ऑनलाईन प्रशिक्षण, स्कूल हेल्थ प्रोग्राम, परीक्षा पे चर्चा, पायाभूत अध्ययन अभ्यास (FLS), राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), गोष्टींचा शनिवार, १०० दिवस वाचन अभियान, शिकू आनंदे, कला उत्सव, विद्या प्रवेश (शाळा पूर्व तयारी), गमंत विज्ञानाची, इ.१० वी परीक्षेची यशस्वी तयारी, निपुण भारत अभियान, गणितोत्सव, शाळापूर्व तयारी अभियान, आदर्श शाळा भेटी, शिक्षण परिषद, केंद्रप्रमुख शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (KPALP) इत्यादी अशा विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यासंदर्भात पत्र,ई-मेल व परिषदेच्या संकेतस्थळाव्दारे आपणास अवगत करण्यात येते.

सदर उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी तसेच सर्व उपक्रमांची माहिती,सर्व सूचना संबधित विद्यार्थी, शिक्षक, पालक व अन्य संबंधित घटकांपर्यंत वेळेत पोहचविण्या संदर्भात मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

याबाबत आपल्या स्तरावरुन सर्वाना अवगत करण्यात यावे.

(एम डी सिंह)
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद,महाराष्ट्र,पुणे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,मुंबई.

२) मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय,म.रा.पुणे.